# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५ / फाल्गुन १९, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूंकप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

**मौजे भाल (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे होत असलेल्या अवैध माती उत्खननाबाबत**

**(१) * ३८७० श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न १६८१ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाल (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सामाईक ग्रामस्थ मंडळाच्या जागेतून ७०० ब्रास मातीचे विनापरवाना उत्खनन झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असता तसेच बेकायदेशीर माती उत्खननाबाबत तहसिलदार, अलिबाग (जि.रायगड) यांचेकडे पूराव्यनिशी ग्रामस्थांनी तक्रार केली असता अज्ञात इसमाविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हा केव्हा दाखल केला आहे,

(३) गुन्हा दाखल झाल्यानंतर अज्ञात इसमाचा शोध पोलिसांनी घेतला आहे काय,

(४) असल्यास, गुन्ह्यातील अज्ञात इमस कोण आहे याबाबत खात्री करण्यात आली आहे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) प्रश्नाधीन प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द अलिबाग पोलीस स्टेशन येथे दिनांक २१/११/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) होय. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये, श्री.गिरीष गजानन म्हात्रे व श्री.संतोष मारुती किर हे आरोपी असल्याचे निदर्शनास आले आहे.

---

**वाढत्या वीज दरांमुळे विदर्भातील उद्योग परराज्यात जात असल्याबाबत**

**(२) * ३६८३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात व इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक विजेचे दर अधिक आहेत, हे खरे आहे काय,

(२) पूर्वीच्या शासनाने लागू केलेली वीज सबसिडी विद्यमान शासनाने माहे नोव्हेंबर, २०१४ पासून काढून घेतल्याने विदर्भातील स्टील कंपन्यांनी उद्योग गुंडाळून शेजारच्या मध्यप्रदेश किंवा छत्तीसगड राज्यात जाण्याची तयारी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) औद्योगिक विजेची सबसिडी शासनाने काढल्याने या वीजेचे दर ९.५० रुपये इतके कडाडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पूर्वीच्या शासनाने सुरु केलेली सबसिडी रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) राज्यात औद्योगिक वीजेचे दर अधिक असल्याने विदर्भातील स्टील कंपन्यांचे इतर राज्यात होणारे स्थलांतर परिणामकारकरीत्या थांबवण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) राज्याच्या साधनसंपत्तीचा विचार करता ही सवलत रद्द करण्यात आली आहे.

(५) नोव्हेंबर २०१४ ला बंद करण्यात असलेली सबसिडी डिसेंबर २०१४ साठी औद्योगिक ग्राहकासाठी पुन्हा सुरु ठेवली तसेच एप्रिल २०१५ पासून होणा-या प्रस्तावित वीज दर वाढीच्या प्रस्तावामध्ये औद्योगिक ग्राहकांचे वीज दर कमी ठेवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

-----------------

**प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे तसेच, मुंबईतील आरटीओ कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेला एंजटचा वावर**

**(३) * ३१८४ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयंत पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामकाजातून एजंटचा सहभाग पूर्णपणे बंद करण्याचा सक्त आदेश परिवहन आयुक्तांनी राज्यभरातील सर्व प्रादेशिक, उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना दिले असतानाही पुणे आरटीओ येथे एजंटचा वावर सुरू होत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबईतील ताडदेव, अंधेरी, वडाळा, बोरिवली व पेण आदि आरटीओ कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात एजंटचा सुळसुळाट असून त्यांचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्यामुळे परिवहन आयुक्त यांनी दलालांना हद्दपार करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशामुळे आरटीओ कार्यालयातील अधिकाऱ्यांनी असहकार काम सुरू केले असून नागरिकांची जाणीवपूर्वक कामे रखडवत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच, राज्यातील परिवहन कार्यालयातील कामे दलालामार्फत करण्यात येऊ नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) यासंदर्भात परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक ०८.०१.२००७ व ०३.०३.२०१२ रोजी सुचना जारी केल्या आहेत. तसेच १७.१०.२०१४ रोजी परिवहन आयुक्तांनी अर्ध शासकीय पत्राद्वारे क्षेत्रिय अधिका-यांना परत सूचना दिलेल्या आहेत. तसेच दिनांक १२.०१.२०१५ व २२.०१.२०१५ अन्वये ई-मेल द्वारे क्षेत्रिय अधिका-यांना परत सूचना दिलेल्या आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे एजंटचा वावर असल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(३) हे खरे नाही. त्यामुळे याबाबत चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, परिवहन कार्यालयातील सर्व सेवा मध्यस्थाशिवाय देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. नागरीकांस त्याच्या कामासाठी अनधिकृत व्यक्तीकडे जाण्याची गरज पडू नये या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, ऑनलाईन अपॉईन्टमेन्ट, वेबसाईटद्वारे अर्ज व कार्यपध्दतीची माहिती व कार्यालयात लावलेल्या माहिती फलकांचा समावेश आहे. परिवहन आयुक्तांनी राज्यातील ७ महापालिका आयुक्तांना प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभोवताली असलेली तथाकथीत एजंट वापर करीत असलेली अनधिकृत बांधकामे/ टपऱ्या काढण्याबाबत दिनांक २१/०१/२०१५ रोजीच्या अर्ध शासकीय पत्राद्वारे विनंती केली.
(४) परिवहन कार्यालयात बहुतांश कामे अनधिकृत व्यक्तींच्या माध्यमातून होत असल्याचे निदर्शनास आल्याने व जनतेस कोणताही अधिक भूर्दंड या अनधिकृत व्यक्तींच्या माध्यमातून देण्यास भाग पडु नये म्हणून
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना E.B.C. देण्याबाबत

**(४) * ३९५० श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठांप्रमाणे १७,५०० रुपये प्रती विद्यार्थी E.B.C. दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांना फक्त ११,०००/- रुपये E.B.C. दिली जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन इतर विद्यापीठाप्रमाणे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना E.B.C. देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(४) असल्यास, कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना E.B.C.कधी देणार व त्याचे स्वरुप काय आहे,

(५) याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शासन निर्णय क्र. अेजीयु २००८/प्र.क्र.७/७-अे दि. मार्च, २००८ प्रमाणे खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती, विमाप्र व इमाव प्रवर्गातील आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० % रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते.

सन २०१२-१३ पर्यंत खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित कृषी अभियांत्रिकी व कृषी व्यवस्थापन महाविद्यालयामधील आर्थिकदृष्टया मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकुण शिक्षण शुल्काच्या (रु.३५,०००/-) ५० % रु.१७,५००/- ई.बी.सी. देय आहे. खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित कृषी जैवतंत्रज्ञान, कृषि अन्नतंत्र महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया मागासप्रर्वातील विद्यार्थ्यांना एकुण शिक्षण शुल्काच्या (रु.६५,०००/-) ५० % रु.=३२,५०० /- ई.बी.सी. देय आहे.

सन २०१३-१४ साली शैक्षणिक शुल्कात वाढ केल्यामुळे खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित कृषी, कृषी अभियांत्रीकी व कृषी व्यवस्थापन महाविद्यालयामधील आर्थिकदृष्टया मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकुण शिक्षण शुल्काच्या (रु.४५,०००/-) ५० % २२५००/- ई.बी.सी. देय आहे खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कृषी जैव तंत्रज्ञान, कृषी अन्न तंत्र महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एकूण शिक्षण शुल्काच्या (७५०००/-) ५० % रु.३७,५००/- ई.बी.सी. देय आहे.

(२), (३), (४) व (५) सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून ई.बी.सी. लाभार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीकरिता दिले जाणारे अनुदान आवश्यकतेपेक्षा कमी दिले गेल्यामुळे शैक्षणिक शुल्काची संपुर्ण प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही, करिता उर्वरित रकमेची मागणी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मागील वर्षभरात मराठवाडयात ५५१ शेतकऱ्यांनी नापिकी व कर्जबाजारीपणामुळे केलेल्या आत्महत्या**

**(५) * ३०३५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामराव वडकुते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यातील बीड, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, जालना जिल्हयात तसेच विदर्भातील नागपूर जिल्हयात गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, टंचाई परिस्थिती, नापिकी, कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी २०१४ मधील नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणेनुसार आर्थिक पॅकेजची तरतूद करण्यात आली आहे काय व किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, दिवसे दिवस वाढत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सहानुभूतपूर्वक व योग्य प्रकारे कार्यवाही होण्याबाबत लवकरात लवकर आर्थिक पॅकेजची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास सदर घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

औरंगाबाद विभागात सन २०१४ या वर्षात (जानेवारी ते डिसेंबर) एकूण ५७४ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी चौकशीअंती पात्र ठरलेल्या ४२९ प्रकरणी वारसदारांना प्रत्येकी रु. १.०० लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे. १४३ प्रकरणे अपात्र ठरली असून उर्वरित ०२ प्रकरणांची चौकशी सुरु आहे.

नागपूर जिल्हयात माहे जानेवारी, २०१५ मध्ये ०६ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली असून त्यांची चौकशी सुरु आहे.

(२) व (३) बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासन निर्णय दि.०७/१/२०१५ व दि. ०२/०२/२०१५ अन्वये प्रत्येकी रु.२०००/- कोटी याप्रमाणे एकूण रु.४०००/- कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) शेतकरी आत्महत्या प्रकरणी मयत शेतकऱ्यांच्या कुटूंबियांस रु. १.०० लक्ष रक्कम देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरासह जिल्ह्यात वीजेच्या समस्या मार्गी लावण्यासाठी घेण्यात येणा-या बैठकीबाबत**

**(६) * ३४०० श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरासह जिल्ह्यात वीजेच्या समस्या मार्गी लावण्यासाठी घेण्यात येणारी जिल्हा विद्युतीकरण समितीची बैठक गेल्या सहा वर्षात घेण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळालेली रोहित्रे बदलून देणे, कमी दाबाने वीज पुरवठा, अवेळी गायब होणारी वीज, वाढवून येणारी वीज बिले याबाबत समितीची बैठक होत नसल्याने वीज ग्राहकांना आर्थिक नुकसान सोसावे लागत असुन या सर्व बाबींना जबाबदार असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) जळालेली रोहित्रे बदलून देणे, कमी दाबाने वीज पुरवठा, अवेळी गायब होणारी वीज, वाढवून येणारी वीज बिले या समस्यांवर महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीकडून वेळोवेळी कार्यवाही केली जाते. जिल्हा विद्युतीकरण समन्वय समितीची बैठक होणे किंवा न होणे याचा वरील नियमित प्रशासकीय कामावर कोणताही परिणाम झालेला नसल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मैत्राह वायु (कृष्णा) प्रा.लि.कंपनीने सुमारे २९ कोटी रुपयांचा मुद्रांक बुडविल्याबाबत**

**(७) * ३६६४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मैत्राह वायु (कृष्णा) प्रा.लि.कंपनीने सुमारे २९ कोटी रुपयांचा मुद्रांक बुडविल्याप्रकरणी नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांच्या स्तरावर प्रकरणाचे पुनर्विलोकन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विलोकनाची प्रक्रिया पूर्ण होऊन दंडाच्या वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती, नियमानुसार ५ % प्रमाणे वसुलिची कार्यवाही होण्यास विलंब का होत आहे,

(४) उक्त कंपनीस मुद्रांक माफीसाठी संगनमताने सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द शासन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) मुद्रांक अधिनियमातीत तरतूदीनुसार पुनर्विलोकनाची कार्यवाही नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथे गिरणा नदी पात्रातून बेकायदा वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(८) * २८१३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरालगतच्या गिरणा केटी बंधारा तसेच दाभाडी ते येसगांव पर्यंत अवैध वाळू (गौण खनिज उत्खनन/वाहतुक) उपसा प्रकरणात भरारी पथकाने केलेल्या कारवाई अंतर्गत पोलीसांत सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव तालुक्यातील वाळू चोरी प्रकरणी दाखल गुन्हयांचा सविस्तर तपास करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले व कोण-कोण दोषी असल्याचे दिसून आले व त्यांच्याविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप तपास पूर्ण झाला नसल्यास यासाठी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत आणि प्रचंड अवैध वाळू उपसा थांबविणेबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) व (३) मा.दिवाणी न्यायालयात ३ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. याशिवाय १ प्रकरणात मा.दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार दंडात्मक रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. अन्य २ प्रकरणात पोलीसामार्फत तपास सुरु आहे.

मालेगांव तालुक्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी मंडळनिहाय १० पथकांची स्थापना करण्यात आली असून, कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच मालेगांव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी व कोतवाल यांना गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मासेमारीच्या मोसमात ओएनजीसीद्वारे होणाऱ्या तेल सर्वेक्षणामुळे मच्छिमारांना समुद्रात येण्यास मज्जाव करण्यात येत असल्याबाबत**

**(९) * २८५६ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रात तेलाचे साठे शोधण्यासाठी ओएनजीसीने वसई, अर्नाळा, सातपाटी, कुलाबा, खारदांडा या सागरी पट्ट्यात ऐन मासेमारीच्या हंगामात मच्छीमारांशी कोणत्याही प्रकारे चर्चा न करता सर्वेक्षण सुरू केल्यामुळे मच्छिमारांनी दिनांक १६.१.२०१५ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करून सर्वेक्षणाला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) स्थानिक मच्छिमार व मच्छिमार संघटनेच्या विनंतीनुसार प्रस्तावित सर्वेक्षण पुढे ढकलण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्हयातील सामुहिक शेततळे व प्लास्टीक अस्तरीकरणासाठी शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत**

**(१०) * २६४५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील कृषी विभागामार्फत राबविण्यात आलेल्या सामुहिक शेततळे व प्लास्टीक अस्तरीकरण यासाठी शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नसल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अद्याप शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुदान वितरीत करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) विलंब झाला असल्यास संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) दोन लाभार्थ्यांच्या सामुहिक शेततळे प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे त्यांना अनुदान वितरीत करण्यात आलेले नव्हते. तथापि आता सदर त्रुटी दुर करण्यात आलेल्या असून दोन्ही लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदानाच्या रकमा जमा करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे-मुलुंड रेल्वे स्थानकादरम्यान विस्तारीत ठाणे रेल्वेस्थानक उभारणीबाबत**

**(११) * ३५४४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे आणि मुलुंड स्थानका दरम्यान विस्तारीत ठाणे रेल्वे स्थानक उभारण्यात येणार असल्याचे मा.रेल्वेमंत्री, भारत सरकार, यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री (सा.उ.) व पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांच्या उपस्थितीत जाहीर केले असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विस्तारित रेल्वे स्थानक उभारणी बाबतची प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व त्याकरिता किती निधी लागणार असून आतापर्यंत किती निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, तसेच, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत तसेच, त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**भोरवंड शिवार ता.नांदुरा, जि.बुलढाणा येथील श्री.धाबे यांच्या गिट्टी खदानमधून व लागून असलेल्या ईक्लास जमिनीवर होत असलेले अवैध खोदकाम**

**(१२) * २९०३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोरवंड शिवार (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील श्री.धाबे यांच्या गिट्टी खदानमधून व लागून असलेल्या ई क्लास जमिनीवर अवैध खोदकाम होत असल्याने शासनाचे प्रचंड नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तात्काळ चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी तथा बुडविलेल्या महसुलाची वसुली करावी अशी मागणी श्री.शिंदे यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी व दोषींवरील कारवाईचे स्वरुप कोणते, नसल्यास, त्याची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे भोरवंड शिवारात गट क्रमांक २६ मध्ये श्री.ईश्वर मुन्सीराम धाबे व गट क्रमांक ३१ मध्ये श्री.यशवंत मुन्सीराम धाबे यांचे मालकीचे शेतात खदान व क्रशर असुन पश्चिमेस ई-क्लास गट क्रमांक २४३ जमीन आहे. श्री.श्रीकृष्ण आनंदा शिंदे या तक्रारदाराने दिनांक ५/११/२०१४ च्या निवेदनान्वये मौजे भोरवंड शिवार, ता.नांदूर येथील गट क्रमांक २४३ शासनाच्या ई-क्लास जमिनीवर अवैध खोदकाम होत असल्याची तक्रार केली आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार नांदुरा यांनी संयुक्त पथकाद्वारे तक्रारदार यांच्यासमवेत स्थळ पाहणी केली असता, सदर ई-क्लास जमीनीमधून उत्खनन झाल्याचे आढळून आले नाही. तक्रारदार यांनी स्थळ पाहणीच्या पंचनाम्यावर स्वाक्षरी करण्यास नकार देऊन, मौजे भाेरवंड येथिल श्री.यशवंत धाबे यांच्या गिट्टी खदान व ई-क्लास जमिनीच्या खोदकामाची फेरमोजणी करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार भूमि अभिलेख विभागास फेरमोजणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील तहसील कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(१३) * ४०३६ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील तहसील कार्यालयातील तहसिलदार, कनिष्ठ लिपिक, अव्वल कारकून, तलाठी व शिपाई यांची पदे रिक्त आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बाब आ.पांडुरंग फुंडकर, विधानपरिषद सदस्य यांनी माहे डिसेंबर २०१४ या विधीमंडळ अधिवेशनात सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत प्रश्नाव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हि पदे रिक्त असल्यामुळे सामान्य नागरीकांची तहसील कार्यालयातील कामे ठप्प पडले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहु रिक्त पदे भरण्यासंबंधी वारंवार मागणी करून सुध्दा पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(५) सदरहू रिक्त पदे भरण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) खामगांव तहसिल कार्यालयातील केवळ एक कनिष्ठ लिपीकाचे व दोन शिपायांची पदे रिक्त आहेत.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) कनिष्ठ लिपीकाचे एक पद व शिपायांची दोन पदे वगळता सद्यस्थितीत तहसिल कार्यालय खामगांवचे आकृतीबंधा नुसार मंजूर असलेली सर्व पदे भरण्यात आली असून उपरोक्त रिक्त असलेली पदे नियमानुसार पदोन्नतीने अथवा भरती प्रक्रियेतून भरण्यात येतील.

-----------------

**वाहन कराची सुमारे ७३ लाखांची रक्कम परस्पर वापरल्याबाबत**

**(१४) * ३२५४ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन कार्यालयाने मोटारवाहन कर, दंड व व्यवसाय करापोटी जमा झालेली रक्कम सुमारे ७३ लक्ष रुपये कोषागारात न भरता परस्पर वापरल्याबाबतचा गुन्हा बारामती पोलीस ठाण्यामध्ये माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहाराचे निश्चित स्वरुप काय आहे,

(३) सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या व ज्यांचे विरोधात गुन्हा दाखल झाला आहे त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, दोषी अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-१३ या कालावधीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथे जमा होणाऱ्या व्यवसाय कराच्या रकमांमध्ये रुपये ७४.७६ लाखाच्या रकमा शासनाच्या खात्यावर जमा करण्यात आल्या नाहीत असे महालेखापाल व प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले. त्यानंतर सदरच्या रक्कम व्याजासहित शासकीय तिजोरीत जमा करण्यात आल्या. सदरची रक्कम काही काळ शासन खात्याबाहेर राहिल्याने अपहार प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती यांनी दि.०९/०१/२०१५ रोजी पोलीस स्टेशन तालुका बारामती या ठीकाणी क्र. ८/१५ अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

(३) **अ)** खालील कर्मचाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशन, बारामती येथे दिनांक ०९.०१.२०१५ रोजी गु.रु.नं. - ८/२०१५ भा.द.वि. कलम ४०९/३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना मा. अपर जिल्हा सत्र न्यायालय, बारामती यांनी पुर्व अंतरीम (अॅड इंटेरीम) जामिन दिला आहे.

(१) भानुदास लक्ष्मण तपकिर, कनिष्ठ लेखा परिक्षक, ता. हवेली, जि.पुणे
(२) यादव यशवंत भांगे, कनिष्ठ लेखा परिक्षक ता.हवेली, जि.पुणे
(३) अशोक बबन गोगावले, वरिष्ठ लिपिक, ता.हवेली, जि.पुणे
(४) मोहन किसन खुळे, वरिष्ठ लिपीक, मोरारजी पेठ, सोलापूर

**(ब)** तसेच या प्रकरणी ज्या कर्मचाऱ्यांनी विहीत मुदतीत जमा रकमांचा ताळमेळ घेण्यामध्ये कसूर केली होती त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील), नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयी विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे.

(१) श्री. देविदास एकनाथ कामठे, कनिष्ठ लेखा परिक्षक
(२) श्री. अनिल गोविंद पिलाने, वरिष्ठ लिपीक
(३) श्री. अशोक बबन गोगावले, वरिष्ठ लिपीक
(४) श्री.यादव यशवंत भांगे, कनिष्ठ लेखा परिक्षक

**(क)** प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती या कार्यालयातील ज्या इतर कर्मचाऱ्यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडलेली नाही. अशा कर्मचाऱ्यांची पुढील एक वेतनवाढ भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम रोखून ठेवण्याची शिक्षा देण्यात आली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेतः

१. श्री.प्रशांत जनार्दन पवार, कनिष्ठ लिपीक
२. श्रीमती अश्विनी सुरेश जाधव, कनिष्ठ लिपीक
३. श्रीमती वृशाली लघुदेव बेलदार, कनिष्ठ लिपीक
४. श्रीमती अनुप्रिया शरद मोरे, कनिष्ठ लिपीक
५. श्री.विजय यादव दामसे, वरिष्ठ लिपीक
६. श्री. रामचंद्र लिंबाजी घुटे, वरिष्ठ लिपीक

**(ड)** तसेच पुढील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित करण्याची शिक्षा लादण्यात आली आहे.

१. श्री.महादेव कल्लाप्पा बिराजदार, कनिष्ठ लेखा परिक्षक
२. श्री. हेमंत कुसूमाकर देशमुख, कनिष्ठ लिपीक
३. श्री. अशोक लक्ष्मण गरड, कनिष्ठ लिपीक.

(४) १, २, ३ नुसार प्रश्न अप्रस्तुत ठरतो.

-----------------

**दरीबडची (ता.जत, जि.सांगली) येथे पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने उपचाराअभावी जनावरांचा होत असलेला मृत्यू**

**(१५) * ४१५२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरीबडची (ता.जत, जि.सांगली) येथे २७ लाख रुपये खर्च करुन उभारलेला दवाखान्याचा कारभार मागील पाच वर्षापासून कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकारी अभावी सुरु असल्याने तालुक्यातील २० हजार ३२९ जनावरांवर उपचार होत नसल्याने आतापर्यंत विविध अजारांनी ग्रस्त असलेल्या १७ जनावरांचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांच्या विविध आजारांची लस मोहिम शिबिरे होत नाहीत परंतू कागदोपत्री शिबिरे झाल्याचे दर्शविण्यात येत असून डॉक्टरांअभावी पशुसंवर्धन विभागाकडून आलेली औषधे तालुक्यामधून उचललीच जात नसल्याने तेथील शेतकरी आपल्या जनावरांवर खाजगी डॉक्टरांकडून महागडे उपचार करुन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त दवाखाना डॉक्टरासह सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: उक्त दवाखाना केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ दरीबडची येथील पशुधन विकास अधिकारी या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला असून दवाखान्याचे कामकाज नियमितपणे सुरु आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील हवेली हवेली भुमी अभिलेख कार्यालयात मोजणी प्रकरण वेळेत पूर्ण होत नसल्याबाबत**

**(१६) * ३२७६ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हवेली भूमी अभिलेख कार्यालयामध्ये मोजणीचा अर्ज दिल्यानंतर अनेक दिवसांनंतरही वेळेत पूर्ण होत नाहीत, केवळ बिल्डरांची व अर्थपूर्ण व्यवहार करणाऱ्यांची कामे करण्यासाठी तारीख मिळते असे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने काही उपाययोजना केली आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

उप अधिक्षक भूमी अभिलेख, हवेली या कार्यालयात प्राप्त होणा-या मोजणी प्रकरणात वेळेचे नियोजन व संनियंत्रणाची कार्यवाही ई-मोजणी या आज्ञावलीद्वारे करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तलासरी (जि.पालघर) येथे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(१७) * ४०७० श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथे वीज पुरवठा करणारी ३३ के.व्ही.मुख्य वाहिनी ४० वर्षे जुनी असून वीजवाहक तारा आणि खांब जीर्ण झाल्याने त्यांची देखभाल-दुरुस्ती न केल्यामुळे वारंवार वीजेच्या तारा तुटून रात्री-अपरात्री वीज खंडीत होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडीत झाला असताना दुरुस्तीसाठी गेलेले कनिष्ठ अभियंता श्री.तोरपे हे झाडावरुन पडून जखमी झाल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने तलासरी येथे वारंवार खंडीत होत असलेला वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत तसेच वीज दुरुस्ती करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत शासन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) १३२/३३ केव्ही डहाणू उच्चदाब उपकेंद्रामधून ३३ केव्ही तलासरी उच्चदाब वाहिनी निर्गमित होते. पायाभूत आराखडा-१ योजनेतंर्गत सदर ३३ केव्ही तलासरी वाहिनी बदलण्याचे एकूण २८ कि.मी. चे काम अंतर्भुत करण्यात आलेले आहे. त्यापैकी सुमारे ८.५ कि.मी. (८५ पोल) वरील जीर्ण झालेल्या उच्चदाब वाहिनीच्या ACSR ०.०६ क्षमतेच्या तारा बदलून जास्त क्षमतेच्या नवीन तारा टाकण्यात आल्या आहेत. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कंत्राटदारास आदेश देण्यात आलेले आहेत व काम प्रगतीथावर आहे. तसेच तलासरी उपविभागातील सर्व तांत्रिक कर्मचा-यांना सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सुरक्षा साधने पुरविण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खरीप हंगामातील आपदग्रस्त कोकणातील भात शेती आणि आंबा**

**बागायतदार शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत**

**(१८) * ४०९८ श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामातील आपदग्रस्त कोकणातील भात शेती आणि आंबा बागायतदार शेतकऱ्यांना शासनाकडून अद्यापी कोणतीही तातडीची मदत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने कोकणातील आपदग्रस्त भात शेती व आंबा बागायतदारांना किती दिवसात मदत देण्यात येणार आहे,

(४) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) कोकणातील खरीप हंगामाची पैसेवारी प्रसिध्द करण्यात आली असून कोकाणातील सर्व गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा जास्त असल्याने आपादग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विज वितरण कंपनीच्या माध्यमातून विज वितरण अत्याधुनिक करण्यासाठी कमी निधी उपलब्ध करुन दिल्याबाबत**

**(१९) * ३८४८ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विज वितरण कंपनीच्या माध्यमातून राज्यातील विज वितरण अत्याधुनिक करण्याच्या हेतूने शासनाने ५५५६.५ कोटी रूपयांचा प्रकल्प सन २०१२ ते २०१५-१६ या ३ वर्षात पूर्ण करण्याचा निर्णय घेतला असता विदर्भातील अमरावती विभाग ४६५.२ कोटी, नागपूर विभागासाठी ४१३.१० कोटी रुपये असे विदर्भाच्या ११ जिल्ह्यासाठी फक्त ८७९.०२ कोटी रूपये देवून विदर्भावर अन्याय करित असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ ला उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ्या प्रमाणात अनुषेश असलेल्या विदर्भावर अन्याय होत असल्याने शासन याची दखल घेणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विदर्भातील ११ जिल्ह्यासाठी पायाभूत आराखडा- २ अंतर्गत विभागवार प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी केल्यानंतर महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडून सदर प्रस्तावास मान्यता घेण्यात आल्यानुसार ई-टेंडरीगच्या माध्यमातून निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यामध्ये अमरावती विभागामाध्ये रु. ६२०.३३ कोटीची तसेच नागपूर विभागासाठी रु. ४९७.८२ कोटीची कामे प्रस्तावित असून ती प्रगतीपथावर आहेत.

(२) व (३) विदर्भातील अनुशेष दूर करण्यासाठी दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना व

आयपीडीएस या योजनेतून अनुक्रमे रु. ४७०९.५९ कोटी व रु. २३१०.२ कोटी अशी एकूण रु. ७०१९.७९ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे. तसेच कृषीपंपाना विज जोडणी देण्याच्या आवश्यक कामासाठी रु. ३५९ कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. सदर निधी उपलब्ध होताच तातडीने कामाची पूर्तता करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खाजगी तसेच नोंदणीकृत साध्या दोषरहित बसेसची वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२०) * ३४९१ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभर धावणाऱ्या खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या स्लीपरकोच, साध्या बस या नोंदणीकृत असूनही दोषरहित असल्याचे अशा बसेसवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश मा.न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रवाशांची सुरक्षितता लक्षांत घेता शासनाकडून संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) दोषरहित बसेसवर कारवाई करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे कोणतेही आदेश नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुस्लीम समाजाच्या विकासासाठी मौलाना आझाद औद्योगिक विकास महामंडळाला गेल्या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या निधीचे वाटप करणेबाबत**

**(२१) * २९९६ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्ज मंजूरीसाठी मौलाना आझाद औद्योगिक विकास महामंडळाला गेल्या अर्थसंकल्पात रुपये ५०० कोटी मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामंडळाकडे उमेदवारांकडे हजारो अर्ज प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर करण्यात आलेल्या किती निधीचे वाटप करण्यात आले आहे,

(४) असल्यास, उर्वरित निधीचे अर्जदार उमेदवारांना वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे

काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला स्थापनेपासून (सन २०००) शासनामार्फत रु. २६८,१९१० कोटी इतके भाग भांडवल वितरीत करण्यात आले आहे,

(२), (३) व (४) महामंडळाकडे सन २०१४ मध्ये थेट कर्ज योजने अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ६३२१२ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामधून सोडत पध्दतीने १८७५० लाभार्थ्यांची नावे महामंडळाने जाहीर केली आहेत. त्यापैकी १५४६० लाभार्थ्यांनी आवश्यक असलेली कागदपत्रे जमा केली आहेत. वैधानिक कागदपत्रे जमा केलेल्या लाभार्थ्यांपैकी १०५५४ लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. दि.१ एप्रिल, २०१४ पासून ५० कोटी १५ लाख ३२ हजार इतक्या निधीचे वाटप करण्यात आले आहे, उर्वरित लाभार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर त्यांना कर्जवाटप करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यांवर आरटीओ अधिकाऱ्यांकडून कोटयावधी रुपयांचा होत असलेला भ्रष्टाचार**

**(२२) * २९७१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओव्हरलोड, कर, परमिट, पासिंग अशा विविध प्रकरणी राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यांवर आरटीओ अधिकाऱ्यांकडून कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीओच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने वर्षानुवर्षे चाललेल्या या रॅकेटच्या व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली, तसेच राज्यातील २२ सीमा तपासणी नाक्यावरील व्यवहार पारदर्शकता होण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही. यासंदर्भात माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास परिवहन अधिकाऱ्यांविरुध्द भ्रष्टाचाराबाबत कोणताही गुन्हा नोंद नाही.

(२) व (३) ज्या सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण झालेले आहे तेथे पारदर्शकता आणण्यासाठी सर्व व्यवहार हे संगणकीकरणाद्वारे करुन आणि कमीत कमी मानवी हस्तक्षेप होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुरु केल्या आहेत. सेवापुरवठादाराच्या कामकाजातील त्रुटींबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. उर्वरित सीमा तपासणी नाक्यांच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया चालु आहे. सदर सेवापुरवठादार यांना त्यांच्या कामकाजात सुधारणा करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर महसूल विभागातील नायब तहसिलदार ते अति. जिल्हाधिकारी**

**पर्यंत विविध अधिकाऱ्यांचे पदे रिक्त असल्याबाबत**

**(२३) * २९३७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महसूल विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकारी ते नायब तहसिलदार पर्यंत विविध अधिकाऱ्यांचे ३९८ पदे रिक्त असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान उघडकिस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) दिनांक २१.१२.२०१४ रोजी नागपूर महसूल विभागात अतिरिक्त जिल्हाधिकारी ४ पदे, उपजिल्हाधिकारी ९ पदे, तहसिलदार २१ पदे व नायब तहसिलदार ७४ पदे अशी एकूण १०८ पदे रिक्त होती. त्यापैकी काही पदे भरण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उर्वरीत पदे भरण्याचे अनुषंगाने शासन व विभागीय आयुक्त स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औष्णिक विद्‌युत केंद्रातील राखेच्या विल्हेवाटाबाबत**

**(२४) * २७०६ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक विद्‌युत केंद्रामधुन निघणाऱ्या राखेची विल्हेवाट लावण्याकरीता फार मोठया प्रमाणात पाण्याचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राखेमध्ये पाऱ्याचे अंश असल्यामुळे या पाण्याचा पुनर्वापर करण्याकरीता महागडी यंत्रणा अवलंबावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर राज्यात या राखेच्या विल्हेवाटाकरीता (dry bottam ash removal system) चा वापर बंधनकारक करण्यात आले असून उक्त पध्दत राज्यातील औष्णिक विद्‌युत केंद्रांना बंधनकारक करण्यात येणार आहे काय,

(४) उक्त प्रकरणी अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच पाण्याचा वापर रोखण्याकरीता प्रभावी पर्यायी उपाययोजना अवलंबिण्यात येणार आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राखेमध्ये पाऱ्याचा अंश नगण्य स्वरुपाचा असतो. त्यामुळे हे म्हणणे खरे नाही.

(३) ड्राय बॉटम ॲश रिमूव्हल सिस्टीम च्या वापरासंदर्भात निर्देश उपलब्ध नाहीत. मात्र महानिर्मिती कंपनीच्या नवीन कार्यान्वित संचाना कोरडया राखेच्या (dru fly ash) विल्हेवाटीकरिता नवीन तंत्रज्ञानावर आधारीत यंत्रणा बसविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) पाण्याचा वापर रोखण्याकरीता पुढील पर्यायी उपाययोजना अवलंबवण्यात आलेल्या आहेत.
(अ) राखेच्या बंधाऱ्यातून पाणी गोळा करुन त्याचा पुर्नवापर संचामध्ये केला जातो.
(ब) तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर राख हाताळण्यासाठी केला जातो.

-----------------

**राज्यात अवकाळी पावसामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(२५) * ३७३७ श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवकाळी पावसामुळे द्राक्षाचे नुकसान झाले असतांना परदेशी बाजारपेठेत द्राक्षाला एक किलोला केवळ ६५ रुपये भाव दिला जात असल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे सुमारे ३२५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) राज्यातील शेतकऱ्यांना युरोपियन राष्ट्रांमध्ये द्राक्ष निर्यात करण्यासाठी ग्रेपनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामध्ये द्राक्ष बागांची नोंदणी व तपासणी करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यात ३८० तपासणी अधिकारी नियुक्त केलेले आहेत. सदर तपासणी अधिकाऱ्यांमार्फत राज्यातील शेतकऱ्यांसाठी नोंदणीपूर्व व नोंदणीनंतर प्रशिक्षणे आयोजित केली जातात.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रानतळा या माळरानावर अचानक लागलेल्या वणव्यामुळे शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे झालेले नुकसान**

**(२६) * ३०९५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निरवडे, न्हावेली व वेंगुर्ला तालुक्यातील पेंडूर या तीन गावांना जोडणा-या रानतळा या माळरानावर अचानक वणवा लागून सुमारे दिडशे एकर क्षेत्रातील काजू कलमे व गावठी काजू झाडे जळून खाक खाल्याने शेतक-यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनास्थळी जाण्यासाठी अग्शिमन बंबला रस्ताही मिळत नसल्याने आग आटोक्यात आणण्यास विलंब झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील नुकसानाबाबत गावातील महसूल कर्मचा-यांनी पंचनामे करून प्रस्ताव शासन स्तरावर पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाने कोणत्या स्वरूपाची आर्थिक मदत केली आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) या वणव्यामध्ये ७ गावांतील ६७ शेतक-यांचे अंदाजे रु.४८.१६ लाख रुपयांचे नुकसान झाल्याबाबत तहसिलदार सावंतवाडी यांनी अहवाल दिलेला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील रिलायन्स आणि टाटा पॉवर या वीज वाहिन्या कंपन्यामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास पर्याय वीज वाहिनी उपलब्ध करण्याबाबत**

**(२७) * ३०५९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधारी असलेल्या मुंबई शहराला रिलायन्स आणि टाटा पॉवर सध्या दोन हजार मेगावॅट वीज स्वत: उभारलेल्या वीज वाहिन्यांच्या माध्यमातून पुरवते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपन्यांच्या प्रकल्पांमध्ये तांत्रिक बिघाड झाला तर पर्यायी व्यवस्था म्हणून राज्यात उपलब्ध असलेली वीज मुंबईत आणण्यासाठी पुरेशा वीज वाहिन्याच नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात प्राध्यापक खापर्डे यांच्या समितीने दिलेला अहवाल तीन वर्षे शासनाकडे प्रलंबित असून त्यावर शासनाने कोणताच विचार केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत व या अहवालावर विचार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) व (४) प्राध्यापक खापर्डे समितीने केलेल्या बहुतांश अल्पकालीन शिफारीशी अंमलात आणल्या असून दिर्घकालीन स्वरुपातील पारेषण क्षमता वाढविण्यासाठी प्रकल्पांची अंमलबजावणी सुरु आहे.

-----------------

**बोगस व बनावट चेचिस क्रमांकाच्या आधारे होत असलेली ओव्हरलोड वाहतुक**

**(२८) * ३९०१ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोगस व बनावट चेसिस क्रमांकाच्या आधारे ओव्हरलोड वाहतुकीचा धक्कादाय प्रकार होत असल्याचे वर्धा आरटीओ कार्यालयाच्या माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार बनावट चेसिस क्रमांकाद्वारे ओव्हरलोड वाहतूक होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी बोगस चेसिस क्रमांक असलेल्या मोटार वाहन क्रमांक असलेल्या मोटार वाहन क्रमांक CG-०४G-६३७४ च्या वाहन मालकाविरुध्द दि.६.१.२०१५ रोजी सेवाग्राम पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०६/१५ भा.दं.वि. कलम ४२०,४८६,४७१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे. तसेच सदर प्रकरणी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांचेकडून त्यांच्या कार्यालयीन तपासणी पथकास अशी वाहने आएळून आल्यास कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले आहे.

-----------------

**मौजे जांबा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील गावठाण्याची हद्द वाढविण्याबाबत**

**(२९) * ३३०५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जांबा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील गावठाण्याची हद्द वाढविण्याबाबत मागील दोन वर्षापासून कार्यवाही सुरु असूनही सदरहू गावाची हद्द वाढविण्याबाबत अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावाच्या गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत मागील दोन वर्षापासून टाळाटाळ करणाऱ्या दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्यातील महाड तालुक्यात अवैधरित्या सुरु असलेल्या दगडखाणी उत्खनन बंद करण्याबाबत**

**(३०) * ३५८२ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील कोल गावाच्या डोंगरामध्ये बुध्दकालीन लेणी असून या लेण्यालगत दगडखाणी सुरु असल्यामुळे दगडखाणीच्या उत्खननाने हादरे बसून लेण्याचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) या तालुक्यात इतरत्रही अवैध दगडखाणी सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास किती दगडखाणी अवैधरित्या सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास या दगडखाणी बंद करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरे दूध डेअरी बंद होत असल्याने दुग्धशाळा कर्मचाऱ्यांचे उपजिविकेचे साधन बंद होत असल्याबाबत**

**(३१) * ३६२६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १८९६ ला सोमवार दि.१५/१२/२०१४ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे दुग्धशाळेच्या वरळी, कुर्ला, गोरेगाव या तीन दूध डेअरी अतिशय दयनीय अवस्थेत असून तेथील कामगारांच्या उदरनिर्वाहावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई दूध योजन अंतर्गत वरळी, कुर्ला व गोरेगाव या तिन्ही ठिकाणच्या दुग्धशाळा सद्यस्थितीत कार्यरत असून, या तिन्ही दुग्धशाळेतील कोणत्याही कर्मचा-याला कामावरुन कमी केलेले नसून, सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते त्यांना नियमितपणे अदा केले जात आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटी बसमध्ये आगप्रतिबंधक उपकरण व प्रथमोपचार या सुविधा बसविण्याबाबत**

**(३२) * ३१२७ श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक बसमध्ये आगप्रतिबंधक उपकरण व प्रथमोचार पेटी या सुविधा एसटी बसमध्ये बसविण्यात आल्या नसल्यामुळे प्रवाशांना सुविधा मिळत नसल्यामुळे आकस्मित संकटाच्या वेळी प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी बसमध्ये आगप्रतिबंधक उपकरण व प्रथमोपचार पेटी या सुविधा ठेवण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

निदर्शनास आले नाही.

(२) रा.प.महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये आगप्रतिबंधक उपकरण व प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. दरवर्षी सर्व बसेसना आगप्रतिबंधक उपकरण व प्रथमोपचार पेटी असल्याची शहानिशा करुन प्रादेशिक परिवहन खात्याकडून रा.प.महामंडळाच्या सर्व बसेस प्रमाणित करुन घेण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील दूध सागर सोसायटीच्या रहिवाश्यांनी खोटे अभिलेख तयार करून शासनाची जमीन हडप केल्याबाबत**

**(३३) * ३९६९ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील दूध सागर सोसायटीच्या रहिवाश्यांनी आदिवासी असल्याचा कांगावा करून तसेच खोटे अभिलेख तयार करून शासनाची जमीन हडप केल्याच्या आरोपाची चौकशी व्हावी अशी मागणी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. तथापि, यासंदर्भात दि. ०२/०१/२०१५ रोजी एका दैनिकात बातमी आल्याचे दिसुन येते.

(२) वृत्तपत्रातील बातमीची शहानिशा केली असता आरोप वस्तुस्थितिशी विसंगत असल्याचे आढळून आलेले आहे,
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवस्थाने व वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे दुर न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(३४) * २७७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवस्थाने व वक्फ मालमत्तेवरील बेकायदेशीर हस्तांतरणे, अतिक्रमणे बाबत आढावा घेऊन महसूल विभागाच्या दिनांक ३० जुलै, २०१० रोजीच्या शासन परिपत्रकाप्रमाणे सक्षम कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत परभणी-हिंगोलीचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव महसूल यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील शासन परिपत्रकाप्रमाणे विहित मुदतीत आढावा न घेणाऱ्या तसेच ७/१२ वर त्या मालमत्तांची नोंद न घेणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यांच्या विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच देवस्थाने व वक्फ मालमत्ता यांची सातबारावर नोंद घेण्याबाबतची प्रक्रिया किती मुदतीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) या संदर्भात परभणी-हिंगोलीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांचे माहे सप्टेंबर २०१४ च्या सुमारास प्रधान सचिव (महसूल) यांना लिहिलेले पत्र कार्यालयात आढळून आले नाही. तथापि, राज्यातील देवस्थानांच्या जमिनीची तपासणी तसेच या जमिनी बेकायदेशीर हस्तांतरित झाल्या असल्यास, पूर्ववत देवस्थानांच्या नावे करण्याबाबतचे निर्देश शासन परिपत्रक दिनांक ३०.७.२०१० व शुध्दीपत्रक दि.२९.६.२०११ अन्वये देण्यात आले आहेत. राज्यात बेकायदेशीर देवस्थान जमिनीच्या हस्तांतरणाची प्रकरणे शोधण्याची मोहीम घेण्यात आली असून, अशा प्रकरणी पुनरिक्षणाची कार्यवाही सुरु आहे. त्याच प्रमाणे वक्फ मंडळाकडून वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ५२, ५४ व ५५ नुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील मालाड पश्चिमेतील धारोली गावात राज्य शासनाच्या मालकीचा जवळपास ५०० एकर जागेत स्थानिक भूमाफियांकडून परस्पर विक्री होत असल्याबाबत**

**(३५) * ४३४५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिमेतील धारोली गावात राज्य शासनाच्या मालकीचा जवळपास ५०० एकर जागेत स्थानिक भूमाफियांकडून परस्पर विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील अतिक्रमणांमुळे ४४ फुटांचा रस्ता १० फुटांचा झाला असून याप्रकारांकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) अद्याप, यासंदर्भात चौकशी करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये धारोली असे महसूली गाव नसून बोरीवली तालुक्यामध्ये दारवली असे स्वतंत्र महसूली गाव आहे. दारवली गावामधील शासकीय जमिनीची भूमाफियांकडून परस्पर विक्री झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) असे निदर्शनास आले नाही.

उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) मालाड व तहसिलदार, बोरीवली यांचेमार्फत अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड येथील विष्णूनगर भागात अचानक कमी अधिक दाबाचा वीज पुरवठा झाल्याने झालेल्या नुकसानीबाबत

**(३६) * ४३८४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.जि.नांदेड येथील विष्णूनगर भागात डी.पी नंबर, २१२ वरुन कमी अधिक दाबाचा वीज पुरवठा झाल्याने काही घरातील इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, टीव्ही बंद पडू लागले तद्नंतर ट्रान्सफार्मर जळाल्याने प्रचंड स्फोट होऊन परिसरातील ४०-५० घरांमधील टीव्ही, फ्रीज, इलेक्ट्रानिक्स वस्तू, पंखे, कुलर, एसीसारख्या वस्तू अचानक बंद पडून मोठे नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) सदर नादुरुस्त रोहित्र त्वरीत बदलुन तेथील विज पुरवठा सुरळीत करण्यात आला. सदर घटनेची पुढील तपासणी करीता विद्युत निरिक्षक, नांदेड यांना कळविण्यात आलेले आहे. विद्युत निरीक्षकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिकांच्या हमीभावाबाबत राज्याने शिफारस केलेल्या अधारभुत किंमतीमध्ये केंद्रिय कृषी मुल्य समितीने सुमारे २५ ते ५० टक्यांनी कपात केल्याबाबत**

**(३७) * ४७८६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिकांच्या हमीभावाबाबत राज्याने शिफारस केलेल्या आधारभुत किंमतीमध्ये केंद्रिय कृषी मुल्य समितीने सुमारे २५ ते ५० टक्यांनी कपात करुन पिकांचे अवमुल्यन केल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या कृषी मुल्य समितीमुळे व केंद्र शासनाच्या धोरणांमुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपेक्षित हमीभावापासून वंचित असणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) २०१४-१५ च्या खरीप विक्री हंगामाकरिता राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या किंमतींपेक्षा केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती १२ ते ५७ टक्क्यांनी कमी असल्याचे तर २०१५-१६ च्या रब्बी विक्री हंगामाकरिता १८ ते ४८ टक्क्यांनी कमी असल्याचे दिसून येते.

(२) अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) किमान आधारभूत किंमती निश्चित करताना महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती व इतर बाबींचा विचार करता राज्य शासनाने शिफारस केलेल्या किंमती विचारात घेण्यात याव्यात, याबाबत राज्य शासनाकडून केंद्रिय कृषि मूल्य व किंमत आयोगाकडे नेहमीच आग्रही भूमिका घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाला सन २०१० व २०११ मध्ये संगणकीकरणाबाबत लाखो रूपयांचा निधी मिळूनही संगणकीकरण न केल्याबाबत**

**(३८) * ४८९२ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाला सन २०१० व २०११ मध्ये संगणकीकरणासाठी लाखो रुपयांचा निधी मिळूनही वक्फचा कामकाजांचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास संगणकीकरण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच वक्फ बोर्डाच्या कार्यालयात सद्य:स्थितीत संचिकांचे गठ्ठे वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वक्फ बोर्डाचे तातडीने संगणकीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच संचिकांचे गठ्ठे प्राप्त होऊन संगणकीकरण न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यातील कुपोषण निर्मुलनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * ५१२६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: ठाणे व पालघरसह १२ आदिवासी बहूल जिल्ह्यांमध्ये कुपोषण निर्मूलनासाठी कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या फळबाग व भाजीपाला योजनेअंतर्गत सन २०१५ मध्ये ६ लाख रुपये मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ६ लाख रुपयांचा निधी कोणकोणत्या जिल्ह्यांना व किती देण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, या ६ लाख रुपयामध्ये १२ जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना प्रत्यक्षात किती मदत दिली आहे वा देण्यात येणार आहे,
(४) शासनाने आदिवासी बहूल जिल्ह्यातील कुपोषण निर्मूलनाबाबत काही ठोस उपाययोजना आखली आहे काय,
(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) व (३) उपरोक्त रु. ६.०० लाख निधी राज्यातील खालील जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेला आहे :-

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | वितरीत निधी (रक्कम हजार) |
|---|---|---|
| १ | ठाणे | ९०.०० |
| २ | पुणे | ३०.०० |
| ३ | अहमदनगर | ६०.०० |
| ४ | नाशिक | १२०.०० |
| ५ | धुळे | ४५.०० |
| ६ | नंदुरबार | ६०.०० |
| ७ | जळगाव | १५.०० |
| ८ | नांदेड | ३०.०० |
| ९ | अमरावती | १८.०० |
| १० | यवतमाळ | ६०.०० |
| ११ | गडचिरोली | ४२.०० |
| १२ | चंद्रपूर | ३०.०० |
| | एकूण | ६००.०० |

(४) राज्यातील आदिवासी बांधवांच्या आहारामध्ये जिवनसत्व व इतर पोषक द्रव्ये उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सन २००३-०४ पासून आदिवासी कुटूंबांच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील पैठण-फुलंब्री कार्यालयातील उपविभागीय अधिकाऱ्यांचे रिक्त पद भरण्याबाबत

**(४०) * ५४४२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील पैठण-फुलंब्री कार्यालयातील उपविभागीय अधिकाऱ्यांचे पद रिक्त असल्यामुळे बिडकीन व करमाड येथील डीएमआसीच्या तिसऱ्या टप्प्यातील भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकाऱ्यांचे रिक्त असलेले पद त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री या पदावरील श्री.रविंद्र पवार यांची मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव म्हणून नियुक्ती झाल्याने जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या दि.०८.१२.२०१४ च्या आदेशान्वये सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.संभाजी अडकुणे, उपजिल्हाधिकारी (राजशिष्टाचार) यांच्याकडे सोपविण्यात आला असल्याने, डी.एमआयसीची भूसंपादन प्रक्रिया रखडलेली नाही.

(२) व (३) उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री पदावर नियमित अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**जालना जिल्ह्यातील केदारखेडा, पारनेर, रांजणी आदि ठिकाणी पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४१) * ३९२९ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील केदारखेडा, पारनेर, रांजणी आदि ठिकाणी पशुवैद्यकिय तज्ञ नसल्याने दवाखाने सतत बंद असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी कायमस्वरूपी पशुवैद्यकिय अधिकारी नसल्याने परिसरातील जनावरांना आरोग्य सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात एस.टी.बस स्थानकावर स्वच्छता ठेवण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(४२) * ३०३६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस.टी.बस स्थानकावर प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेस प्राधान्य देण्याची सूचना मा.परिवहन मंत्री यांनी एस.टी. अधिकाऱ्यांना केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी.स्थानकावर प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेस पाण्याचे नियोजन अल्प प्रमाणात असल्याने सर्व बस स्थानकांवर स्वच्छता ठेवण्याकरीता शासन मुबलक पाणी पुरवठा करणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासन तातडीने काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) रा. प. महामंडळाच्या बसस्थानकावरील प्रसाधनगृहे विविध संस्थांना दैनंदिन स्वच्छता व देखभालीसाठी "पैसे भरा व वापरा" या तत्वावर देण्यात आलेली आहेत. तसेच काही बसस्थानकावरील प्रसाधनगृहांची व मुतारीगृहांची दैनंदिन स्वच्छता व देखभाल रा.प. महामंडळामार्फत करण्यात येते. प्रसाधनगृहांना लागणा-या पाण्याचा पुरवठा ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इ. यंत्रणामार्फत तसेच रा.प. महामंडळाच्या विंधन विहीर, कुपनलिकेतून करण्यात येतो. प्रसाधनगृह स्वच्छतेसाठी लागणा-या पाण्याचा साठा आवश्यकतेनुसार सर्व बसस्थानकावर उपलब्ध आहे.

(३) ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका इ. शासनाच्या यंत्रणेतून उपाययोजना करण्यात आलेली आहे. तसेच उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासल्यास टँकरद्वारे इतर यंत्रणेमार्फत पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसनाचा निधी न मिळाल्याबाबत

**(४३) * ३४०५ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४११ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.आंबेगाव (जि.पुणे) येथील माळीण गावात मुसळधार पावसाने डोंगराचा कडा कोसळून माहे जुलै-२०१४ मध्ये वा त्यादरम्यान गावातील ४४ घरे गाडली जावून त्यात १५१ लोकांचा मृत्यु झाला, या दुर्घटनेनंतर शासनाकडून तातडीने मदत व पुनर्वसनाचे आश्वासन रखडले असून अद्यापही या गावाचे पुनर्वसन झाले नसून मदतसुध्दा देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळीण गावाच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी निधी उपलब्ध करुन देऊन या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आदिवासी विकास विभाग व पुनर्वसन विभागाकडे निधीचे लेखाशीर्ष नसल्यामुळे अंदाजपत्रकात निधीची तरतूद केली नसल्याने माळीण गावाचे कायमस्वरूपी पुनर्वसन होत नसून तेथील नैसर्गिक आपत्तीधारकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे,

(२) व (३) मदत व पुनर्वसन विभागाकडील लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करण्याबाबत दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगाव (जि. नाशिक) येथे यंत्रामाग उद्योगासाठी देण्यात येणाऱ्या वीज बिलातील प्रस्तावित वीज दरवाढ मागे घेण्याबाबत**

**(४४) * ५२५३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे यंत्रमाग उद्योगावरील मंदीचे सावट पाहता, यंत्रमागासाठी देण्यात येणाऱ्या वीज बीलावरील अनुदान कायम ठेवण्यात यावी, तसेच दरवाढ न करता फिक्स दराने वीज पुरवठा करावा, यामागणीसाठी मालेगांव येथे यत्रमाग उद्योजकांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास मालेगांव अपर जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमाग उद्योगास सन १९९६ पासुन शासनाने वीज दरात सवलत दिलेली असतांना सन २०१४ पासून २० टक्के सबसिडी देणे शासनाने बंद केले व दरवाढ लादली, त्यामुळे यंत्रमाग उद्योग अडचणीत सापडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज वितरण कंपनीने पुढील वर्षासाठी नियामक आयोगाकडे १२ टक्के दरवाढीचा प्रास्तव सादर केला असून इतर आकारणी ३ टक्के केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावित १५ टक्के वीज दरवाढीमुळे मालेगांवचा यंत्रामाग उद्योग बंद होईल किंवा स्थलांतरीत होण्याची संभावना असल्याने वीज दरवाढीबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,

(५) असल्यास, मालेगांव येथील वीज गळतीचे प्रमाण मोठे असून ते रोखून सदरील सवलत देणे शक्य आहे, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०१४ पासून वीज दरात दिलेली अतिरिक्त सवलत मागे घेण्यात आली आहे.

(३) व (४) महावितरण कंपनीतर्फे मा.विद्युत आयोगास आर्थिक वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ करिता बहुवार्षिक वीज दर याचिका (म.वि.नि.आ.प्रकरण क्र.१२१/२०१४) सादर केलेली आहे. सदर याचिकेमध्ये सर्वसाधारण ८% वीज दर वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि, यामध्ये ०-२० केडब्ल्यू मंजूरभार असलेले लघुदाब ओद्योगिक ग्राहक यांना विद्युत आकारात १% कपात तसेच २० केडब्ल्यु पेक्षा अधिक मंजूर भार असलेले औद्योगिक ग्राहक यांना विद्युत आकारात ७% कपात प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच उच्चदाब औद्योगिक अविरत उद्योग (एक्सप्रेस फिडर) यांना विद्युत आकारात ५% कपात प्रस्तावित केलेली आहे.

(५) महावितरण कंपनीतर्फे वीज चोरी करणाऱ्यांवर फिरते पथक, दामिनी पथक, विभागीय स्तरावर गुणवत्ता नियंत्रण अभियंता, यांची पथके स्थापन करुन, यांच्यामार्फत वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर कारवाई करणे तसेच ग्राहकांचे वीज मिटर तपासणी, सदोष वीज मिटर बदलणे इत्यादी कामे करण्यात येत आहे. तसेच औद्योगिक ग्राहकांच्या वाहिन्यांवर तपासणी मिटर लावण्यात आलेले असून त्याद्वारे मिटर वाचनाचे परिक्षण करण्यात येते. मालेगांव विभागातील वीज गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमितपणे कार्यवाही करण्यात येते. तथापि, गळती रोखली म्हणून वीज दरात सवलत देता येणार नाही.

-----------------

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे वाटप करण्यात आलेल्या शेळ्या रोगट असल्याबाबत**

**(४५) * ४६१५ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे नाशिक, सोलापूर आणि सांगली जिल्हयात वाटप करण्यात आलेल्या शेळ्या रोगट असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेळ्यांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून रोग अन्वेषण विभागाच्या प्रयोगशाळेत तपासणी केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी करण्यात आलेले शेळी गटाचे वितरण, त्यापूर्वी आवश्यक असलेले लसीकरण, शेळयांवर करण्यात येणारे वैद्यकीय उपचार व रोगनिदान करतांना घेण्यात येणारी कर्तव्य दक्षता, इत्यादी बाबींची चौकशी करुन चौकशी अंती दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथे महाराणा केबल नेटवर्कचे अवैध कनेक्शन बंद करणेबाबत**

**(४६) * ४०४९ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक केबल कनेक्शन जास्त असूनसुध्दा शासनाकडे कमी कनेक्शन दाखवून शासनाच्या मनोरंजन कर भरण्यामध्ये फसवणूक करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची फसवणूक करणाऱ्या व कर बुडविणाऱ्या महाराणा केबल नेटवर्कच्या संचालकांवर शासन कडक कारवाई करणार आहे काय,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, महाराणा केबल नेटवर्क या कंपनीने खामगांव शहरामध्ये तसेच ग्रामीण क्षेत्रामध्ये अनेक केबल जोडण्या दिलेल्या आहेत.

(२) महाराणा केबल नेटवर्क या कंपनीच्या केबल सेवेसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये या केबल आयोजकाने शहरी भागामध्ये दिलेल्या घोषित जोडण्यांपेक्षा १५५० अतिरिक्त जोडण्या आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे खामगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील सदर केबल आयोजकाकडे असलेल्या केबल सेवेचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सुरु आहे.

(३) व (४) घोषित केबल जोडण्यांपेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या केबल जोडण्यांसंदर्भात महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतुदीनुसार संबंधित केबल चालकाविरुध्द जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

## नागपूर विभागात कुही येथील महावितरण कंपनीच्या वीज वाहिनीच्या तारावरून आकडे टाकून सर्रास वीजचोरी होत असल्याबाबत

**(४७) * ३८४४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात कुही येथील महावितरण कंपनीच्या वीज वाहिनीच्या तारावरून आकडे टाकून सर्रास वीजचोरी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान भरारी पथकाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजचोरी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, ज्यांनी वीजचोरी केली त्यांचा अधिभार प्रामाणिकपणे वीजबिलात भरणा करणाऱ्या वीज ग्राहकांच्या बिलामध्ये नमूद करण्यात येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नागपूर शहर व विभागात वीजबिलात अतिरिक्त अधिभार लावण्यात येतो काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) वीज चोरी करतांना आढळलेल्यावर महावितरणाच्या भरारीपथकानं तसेच उपविभागातील अधिका-यांनी भारतीय विद्युत कायदा २००३ कलम क्र.१३५, १२६ नुसार कार्यवाही केलेली आहे व यापुढे कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) आतापर्यंत कुही उपविभागाअंतर्गत १७ वीज चोरी भरारी पथकाद्वारे पकडण्यात आलेली असून त्यापैकी सहा आकडे टाकून वीज चोरी करीत असलेल्या व्यक्तीवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) खरे नाही.

(५) चोरी बाबत कुठलाही अधिभार लावण्यात येत नाही.

-----------------

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॅरिडॉर या प्रकल्पांसाठी भूसंपादन केलेल्या गावांना त्यांचा मोबदला देण्याबाबत**

**(४८) * ४१९३ श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॅरिडॉर या शासनाच्या महत्वाकांक्षी रोहा, माणगाव प्रकल्पांसाठी २१ गावांमध्ये तसेच विमानतळासाठी एकूण १२ गावांत भूसंपादन करण्यात येणार असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन केलेल्या व्यक्तींना मोबदला देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (अ) नवीन मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पनवेल तालुक्यातील एकूण १२ गावांमधील जमिनी व गावठाण क्षेत्र भूसंपादीत करण्यात येणार आहे .

(ब) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोरसाठी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाने रोहा-माणगांव, पानसई, निजामपूर, पळसगाव, वावे दिवाळी औद्योगिक क्षेत्र अनुक्रमे दि.१२.२.२००९, ९.१२.२०११, २५.४.२०१२, २५.५.२००९ व ३.८.२०१२ रोजी जाहीर केले आहे. त्या तारखेपासून भूसंपादनाचे काम चालू झाले आहे.

(२) (अ) नवीन मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी एकूण १२ गावांचे संपादनासाठी प्रारुप निवाडे विभागीय आयुक्त यांचेकडे मुजूरीस्तव आहेत.

(ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमाचे कलम ३२ (१) प्रसिध्दी झाल्यानंतरच अनुदानाची गरज भासणार आहे. अनुदानाची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविम संस्था, अंधेरी मुंबई यांजकडे केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील शेती कृषी पंप धारकांना वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(४९) * २९४६ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील शेती कृषी पंप धारकांना विज जोडणी मिळण्यासंबंधी गेल्या २-३ वर्षापासून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे अर्जासोबत रक्कमेचा भरणा करूनही वीज कंपनीच्या चुकीच्या अनागोंदी कारभारामुळे ४१३७ कृषी पंपाना अद्यापही वीज जोडणी मिळाले नसल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वीज जोडणीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) सदरील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही

वा उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) चंद्रपूर जिल्ह्यातील पैसे भरुन विद्युत पुरवठ्यासाठी प्रलंबित असणा-या कृषीपंपाची संख्या ३१ मार्च २०१४ रोजी ३३५५ होती व ३१ जानेवारी २०१५ रोजी ४३५२ आहे.
(३) एप्रिल २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यातील २५८७ कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्यात आला असून १३७७ विद्युत पंपांना विद्युत पुरवठा देण्याचे काम प्रगती पथावर आहे. या व्यतिरिक्त २६५० कृषीपंपांना विद्युत पुरवठा करण्यासाठी नुकतीच जानेवारी २०१५ अखेर कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून या कृषीपंपांना जुनै २०१५ अखेर पर्यंत विद्युत पुरवठा देण्याचे नियोजन आहे. या व्यतिरिक्त उर्वरीत ३२५ कृषीपंपाच्या विद्युतीकरणासंबंधी लवकरच निविदा प्रक्रीया सुरू करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील शिंगाडा उत्पादनाच्या वाढीबाबत**

**(५०) * २७०८ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील मासेमाऱ्यांचे शिंगाडा उत्पादन हे प्रमुख व पुरक उत्पादन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकारातील उत्पादन हे बी पासुन उत्पादन नसुन याच्या वेलाचे संपूर्ण वर्षभर संगोपन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिंगाडा उत्पादन वाढीबाबत व त्याचे संगोपन व संशोधन करण्याचा शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या उत्पादनाला वाव मिळण्याकरीता हमी भाव देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, शिंगाडा पिकाचे उत्पन्न वाढीकरीता कोणती पर्यायी उपाययोजना करण्यात येत वा आली आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय.
(३) प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) व (५) शिंगाडा पिकाचे उत्पन्न वाढीकरीता चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मानव विकास योजनेअंतर्गत शेतक-यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी त्यांच्या सद्या प्रचलित पिक पद्धतीव्यतिरिक्त शिंगाडा या पिकाचे प्रयोगादाखल ५ गुठ्यांमध्ये प्रात्यक्षिक घेण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक तालुक्यात ३५ लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. तसेच पाण्याची व्यवस्था उपलब्ध असलेल्या शेतक-यांकडे शिंगाड्याची नर्सरी तयार करण्याचे तसेच त्याच गावात निवडलेल्या इतर लाभार्थ्यांना लागवडीसाठी बियाणे उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**सांगली, मिरज शहरात अवकाळी पावसामुळे द्राक्ष, डाळींब बागायतदारांचे मोठया प्रमाणात झालेले नुकसान**

**(५१) * ३७३९ श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज शहरासह सांगली जिल्ह्यात दिनांक १ व २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्ष, डाळींब बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार जिल्ह्यातील नुकसानग्रस्त बागायतदारांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यात पुनर्वसनाचे बोगस दाखले तयार करून दौंड व शिरुर तालुक्यातील सुमारे ९०० एकर जमीन धरणग्रस्त नसलेल्या व्यक्तींना वाटप झाल्याबाबत**

**(५२) * ३०९८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात पुनर्वसनाचे बोगस दाखले तयार करून दौंड व शिरुर तालुक्यातील सुमारे ९०० एकर जमीन धरणग्रस्त नसलेल्या व्यक्तींना वाटप झाल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

असा प्रकार जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेला नाही तथापि दौंड तालुक्यातील ७७३ हेक्टर जमीन वाटपाबाबत हा प्रकार सन १९९७ ते २००० चे दरम्यान झाल्याचे दिसून येते आणि सन २००० चे दरम्यरन निदर्शनास आला आहे.

(२) होय, सदरहू प्रकरणी बनावट सही व शिक्क्यासह पर्यायी जमीन वाटपाचे आदेश केलेले प्रकरणांचा शोध होऊन त्यापैकी संशयास्पद असल्याचे निदर्शनास आलेल्या प्रकरणांची माहीती उपविभागीय अधिकारी, बारामती यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केली होती. त्यापैकी ९६ प्रकरणांची फेरतपासणी करून अंतिम कार्यवाही करून ३३० एकर जमीन सरकार जमा केलेली आहे. उर्वरीत प्रकरणांत फेरतपासणी करुन सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) दोषी अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन निलंबनाची कार्यवाही करणेत आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील महाजनको, महानिर्मिती व महापारेषण या वीज उत्पादक कंपन्यांच्या दुरवस्थेबाबत**

**(५३) * ३०६६ ॲड.अनिल परब, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानिर्मिती आणि महापारेषण या दोन कंपन्या मोठ्या प्रमाणात तोट्यात गेल्या असल्याने दोन्ही कंपन्यांची काही मालमत्ता विकण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच शेतकऱ्यांना दिली जात असलेल्या ८०० कोटींच्या वीज बिलातील सबसिडीचा भार उद्योग क्षेत्रावर पडत असल्याने उद्योजकांना वीजदरात किमान २५ टक्के कपात करण्याचा विचार करीत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपन्या तोट्यात जाण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर तोटा भरून काढण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात सन २०१४-१५ वर्षी चारा टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(५४) * ३९०७ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सन २०१४-१५ वर्षी चारा टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात असलेल्या ७ लाख ७८ हजार पशुधनाला वर्षासाठी १५.१३ लाख मे टनाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे व जिल्ह्यातील पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही,

(२) होय,

(३) यवतमाळ जिल्हयातील चारा साधारणतः मे, २०१५ पर्यंत पुरेल व तद्नंतर माहे जुन व जुलै, २०१५ या दोन महिन्यांकरिता १.३१ लक्ष मे. टन चा-याची गरज भासेल असा अंदाज आहे. याकरिता पशुसंवर्धन विभागामार्फत वैरण उत्पादनाकरिता चा-याची लागवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वैरण बियाणे वाटप करून मका बियाण्याची लागवड करण्यात आली आहे. तसेच तलावाच्या गाळपेर क्षेत्रावर वैरण लागवडीकरिता शेतक-यांना आवाहन करण्यात आले आहे,

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यात मोठ्याप्रमाणावर**
**अवैध विटभट्टया सुरू असल्याबाबत**

**(५५) * ३३१४ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यातील उमरखेड रोड, खुडी, हेगडी मार्ग, बोरगडी मार्ग, माहूर मार्ग, बोरी, निंबी रोड, शेलू व दिग्रस मार्गावर मोठ्याप्रमाणावर अवैध विटभट्टया सुरू केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागदोपत्री फक्त ७३ विटभट्टयांची संख्या असून प्रत्यक्षात यापेक्षा कितीतरी अधिक विटभट्टया सुरू असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनस्तरावरून याची चौकशी करण्यात आली काय, चौकशीअंती विटभट्टया राजरोसपणे चालू देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌यापि, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पुसद तालुक्यातील हुडी हेगडी मार्गावर २ व बोरगडी मार्गावर ४ विनापरवाना विटांचे पजावे आढळून आले हे खरे आहे.

(२) व (३) पुसद तालुक्यात विटभट्टयांसाठी ६२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी कागदपत्रांची पूर्तता केलेल्या व स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा केलेले ३७ अर्जदार व कागदपत्रांची पूर्तता केलेले कुंभार जातीचे १९ अर्जदार अशा एकूण ५६ अर्जदारांना परवानगी देण्यात आली. कागदपत्रांची पूर्तता न करताच विटभट्टया सुरू केलेल्या ६ अर्जदारांवर रुपये ५,५८,०००/- एवढा दंड आकारुन, त्यांच्या गाव नमूना नंबर ७/१२ वर बोजा चढवून, वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**१५ महिन्यांपासून प्रलंबित असलेली डिझेल परताव्याची रक्कम**
**राज्यातील मच्छिमारांना तात्काळ देण्याबाबत**

**(५६) * ३६३० श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २४२३ ला सोमवार दि.२२/१२/२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांचे डिझेल परताव्याचे १०० कोटी रुपये गेल्या १७ महिन्यापासून शासनाने थकविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) परतावे परत मिळण्याबाबत दिनांक २० जानेवारी, २०१५ पासून करंजा (उरण) येथील मच्छिमार संस्थेने आंदोलन सुरु केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) सन २०१४-१५ मध्ये प्रस्तुत योजनेअंतर्गत उपलब्ध असलेला रु. ३६००.०० लाख इतका निधी संबंधित जिल्हा कार्यालयास वितरीत करण्यात आला आहे. त्याव्यतिरिक्त रु. ११.४६ कोटी अर्थसंकल्पीय वितरीत तरतूद जिल्हा कार्यालयामार्फत अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**दूध उत्पादनवाढीसाठी सातारा जिल्ह्यातील गावांचा**
**कामधेनू योजने अंतर्गत समावेश करण्याबाबत**

**(५७) * ३१४४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दूध उत्पादनवाढीसाठी कामधेनू दत्तक ग्रामयोजने अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील प्रस्तावीत १३१ गावांपैकी ८० गावांची निवड करण्यात आली असून पशुसंवर्धन विभागाने अत्यंत महत्वाचे पाऊल उचललेले आहे असे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खेर आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यातील गावांचा कामधेनू योजने अंतर्गत समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने काही पाऊले उचलेले आहेत काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सातारा जिल्ह्यामध्ये कामधेनू दत्तक ग्राम योजना सन २०१२-१३ पासुन राबविणेत येत असून, सन २०१३-१४ मध्ये सातारा जिल्ह्यातील १२७ गावांमध्ये योजना राबविण्यात आली आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये सातारा जिल्ह्यातील ९१ गावांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे.

----------------

**ठाणे जिल्ह्यातील जव्हार शहरात व आजूबाजूच्या परिसरात**
**भूकंप तीव्रता मापक यंत्र बसविण्याबाबत**

**(५८) * ४३४९ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील जव्हार शहरात व आजूबाजूच्या परिसरात (पाचबत्ती नाक्यापासून सोनारआळी ते तीनबत्ती नाक्यापर्यंत व काही खेडोपाड्यात) वारंवार भूकंपाचे हादरे बसत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भूकंपाच्या हाद-यांची / धक्क्यांचे भूंकप नियंत्रण केंद्र मुंबई-कुलाबा, ठाणे तसेच मेरी, नाशिक येथे कुठलीच नोंद झाली नसल्याचे तहसिलदार यांनी सांगितले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जव्हारच्या भागात भूकंप तीव्रता मापक यंत्र कायमस्वरुपी बसवावे अशी मागणी स्थानिक रहिवासी करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जव्हार भागात कायमस्वरुपी भूकंप तीव्रता मापक यंत्र बसविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड ता.जि.सोलापूर येथील सावरगांव पी. येथील वर्ग. १ चे पशुवैद्यकीय रुग्णालयातील विविध समस्या दूर करण्याबाबत

**(५९) * ४३८५ श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड, ता.जि.सोलापूर येथील सावरगांव पी. येथील वर्ग-१ चे पशुवैद्यकीय रुग्णालय विविध समस्यांच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पशुवैद्यकीय रुग्णालयात अनेक गैरसोयी असून दवाखान्यासाठी जागा उपलब्ध आहे पण कंपाऊण्ड वॉल नसल्याने अतिक्रमण होण्याची शक्यता आहे तसेच इमारतही अर्धवट अवस्थेत आहे, रस्ते नाहीत, कर्मचा-यांसाठी निवासस्थानाची सोय नाही तसेच लसीकरण सेवादाता, लिपिक, परिचर अशी तीन पदे रिक्त आहेत व या इतर गैरसोयी दूर करण्याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) सावरगाव पी. हे ठिकाण सोलापूर जिल्ह्यात नसून, नांदेड जिल्ह्यामध्ये आहे. सदर ठिकाणच्या पशुवैद्यकीय दवाखान्यास जिल्हा परिषदेच्या मालकीची इमारत असून ती सुस्थितीत आहे. सदर दवाखान्याचे परिसरात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही. तसेच कंम्पाउंड वॉलचे बांधकाम घेण्याबाबतचा विषय माहे एप्रिल, २०१५ मध्ये विषयसमिती समोर ठेवण्यात येणार आहे. या दवाखान्यासाठी एक पशुधन विकास अधिकारी, एक पशुधन पर्यवेक्षक, एक पट्टीबंधक व एक परिचर अशी चार पदे मंजूर असून, त्यापैकी फक्त पशुधन पर्यवेक्षक हे पद माहे नोव्हेंबर, २०१४ पासून रिक्त आहे. सदर दवाखान्यास लसीकरण सेवादाता व लिपिक ही पदे मंजूर नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यातील बोगस बियाणे पुरविणाऱ्या कंपनीला पुन्हा परवाना दिल्याबाबत**

**(६०) * ४७८७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बोगस बियाणे पुरविणाऱ्या एका कंपनीला अवघ्या दोन महिन्यात पुन्हा परवाना बहाल करण्यात आल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास दुर्गा इंडस्ट्रिज अकोला या कंपनीमध्ये सोयाबीन इ. पिकांचे अप्रमाणीत बियाणे प्रमाणीत असल्याचे टॅग लावून पॅकिंग करतांना पकडल्यामुळे गुणवत्ता नियंत्रण विभागाने गुन्हे दाखल केलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

मे.इंडो ॲग्रो जिनेटीक्स सिड्स, देवास (म.प्र.) ही बियाणे उत्पादक कंपनी मध्य प्रदेशातील असल्याने व सदर कंपनीस महाराष्ट्रामध्ये परवाना नसल्याने सदर कंपनीला पुन्हा परवाना बहाल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) मे.इंडो ॲग्रो जिनेटीक्स सिड्स, देवास मध्य प्रदेश या कंपनीच्या सोयाबीनच्या बियाण्यांवर मे.दुर्गा ॲग्रो इंडस्ट्रीज, आकोट जि.अकोला येथे अवैधरित्या प्रक्रिया करण्यात येत असल्याचे आढळून आल्याने ते जप्त करुन ५ आरोपी विरुध्द गु.नो.क्र.१०६/२०१४ अन्वये आकोट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. २ आरोपींना अटक करण्यात आलेली असून ३ आरोपींना माननीय न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

-----------------

**पुणे शहरातील कात्रज, मांगलेवाडी, भिलारेवाडी या परिसरात अनधिकृतपणे उत्खन्न करणा-यांवर कारवाई करणेबाबत**

**(६१) * ३४०२ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कात्रज, मांगलेवाडी, भिलारेवाडी या परिसरात टेकडीफोडीचे अनधिकृत प्रकार सुरु झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत टेकडीफोड करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्लक्ष करणा-या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे मांगडेवाडी येथे गीण खनिज उत्खननाचा तात्पूरता परवाना देण्यात आला होता. त्यात मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्याची बाब फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आल्याने, संबंधिताविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७) अनुसार दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरु आहे. तसेच अनधिकृत टेकडीफोड होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येत असून, अवैध उत्खननाची बाब निदर्शनास आल्यास त्याबाबत नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंप्री धनगर (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील मन प्रकल्पातून उपसा सिंचनासाठी ३ डिपी.सह विद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरु करणेबाबत**

**(६२) * ४०५१ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंप्री धनगर (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील मन प्रकल्पातून उपसा सिंचनासाठी ३ डिपी.सह विद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरु करणेबाबत मागील १ वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंत्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील ठिकाणी देऊळगांव साकर्शाहून मन धरणापर्यंत विद्युत लाईन टाकण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकाला माहे मार्च, २०१४ मध्ये एस.पी.ओ. योजने अंतर्गत मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार २५ शेतकऱ्यांनी विद्युत कनेक्शन चार्जेस रु.७५००/- प्रमाणे म.रा.वि.वि.कं. खामगांव यांचेकडे दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी भरणा केला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सगळी प्रक्रिया पूर्ण होऊनसुध्दा या गावातील नागरीकांना व त्यांच्या शेतीला व सिंचनासारख्या मुलभूत गरजेपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर प्रलंबित असलेले ३ डिपी.सह व सहविद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरु करणेबाबत संबंधीतांना शासन स्तरावरुन आदेश देण्यात येणार आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) सदर कामे पायाभूत आराखडा-२ मध्ये समाविष्ट केलेली आहे. जून २०१५ पर्यन्त सदर कामे जेष्ठता यादीनुसार पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.

-----------------

**गडचिरोली जिल्ह्यातील वर्ग दोनच्या शेतजमिनी वर्ग एक मध्ये परावर्तित करण्याबाबत**

**(६३) * २७१३ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील वर्ग २ च्या शेतजमीनी वर्ग १ मध्ये परावर्तीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी-विक्रीने मालकी हक्काद्वारे वहीवाटीत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनीचे वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये परावर्तन न झाल्यामुळे अनेक शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली व पुर्व विदर्भातील जिल्ह्यांमधील अनेक शेतकऱ्यांचे वर्ग २ च्या शेतजमीनीचे वर्ग १ मध्ये होणारे न्यायोचित परावर्तन करण्याकरीता शासनाच्या महाराष्ट्र राज्य जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, शेतजमिन वर्ग १ मध्ये कधी परावर्तन करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २९ (२) (सी) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (विविक्षित भूमीधारकांना भोगवटदार वर्ग-१ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम १९६८ मधील तरतूदीस अनुलक्षून विदर्भातील अनिर्बंधित भूमीधारी (भोगवटदार वर्ग-२) शेतक-यांना भूमीस्वामी (भोगवटदार वर्ग-१) मध्ये परिवर्तित करण्याबाबत शासनाने दि. २ जानेवारी, २०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये आवश्यक निर्देश यापूर्वीच निर्गमित केले आहेत. त्यानुसार गडचिरोली व विदर्भातील इतर जिल्ह्यात प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे क्षेत्रिय पातळीवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात पाऊस, गारपीट आणि गारठा निर्माण झाल्याने नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत**

**(६४) * ३७४१ श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ८५३ ला दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पाऊस, गारपीट आणि गारठा निर्माण झाल्याने शेतीपिकाचे व फळांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सर्वे करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या पिकांचे किती नुकसान झाले आहे व त्यांना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच मदत करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) होय,

(३) नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ या कालावधीमध्ये गारपीट व अवेळी पाऊस यामुळे ३००२३.३ हे. क्षेत्रावरील शेतीपिके व २३१७५.४३ हे. क्षेत्रावरील फळपिकांचे नुकसान झाले आहे. बाधित शेतक-यांना मदत देण्यासाठी दि. ४ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये विशेष स्वरुपात मदत देण्यात येणार आहे.

(४) मदतीची रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील कृषीपंपांच्या थकित वीज बिलाची वसूली पूर्ण करण्याबाबत**

**(६५) * ३०९९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी पंपांच्या वीज बिलाची थकबाकी वाढतच असून ही रक्कम १० हजार ८०० कोटी रूपयांपर्यत पोहोचली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी कृषि पंपाना सरासरी २४०० कोटी रूपयांची आकारणी होत असताना वसूली मात्र सुमारे ९०० कोटी रूपये इतकी अल्प असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर तीन महिन्याला एकदा बिल आकारणी होत असून काही शेतकऱ्यांच्या दबावामुळे आणि महावितरणाची वीज बिल वसुलीतील अकार्यक्षमता यामुळे दरवर्षी कृषि पंपाच्या दोन तृतीयांश वीज बिलाची वसूलीच होत नसल्याचे आढळून येत आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वीज बिलाची वसूली पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(५) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही. राज्यातील थकबाकीदार ग्राहकांच्या वसुलीकरीता महावितरण कंपनी नेहमी प्रयत्नशील असून शासनाकडूनही कृषी ग्राहकांना वीज बिले भरणा करणेबाबत वेळोवेळी आवाहन केले जाते.

(४) कृषी ग्राहकांवरील वीज बिलाच्या थकीत रक्कमेचा बोजा कमी करण्याकरीता शासनाने दिनांक १९.६.२०१४ नुसार 'कृषी संजीवनी योजना-२०१४' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमध्ये भाग घेणा-या कृषी ग्राहकाचे ३१.०३.२०१४ रोजी थकीत असलेले पुर्ण त्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येईल. याकरीता शासनाकडून महावितरण कंपनीस विद्युत कायदा २००३ मधील कलम ६५ च्या तरतुदी प्रमाणे रोखीने व समप्रमाणात अनुदान अदा करण्यात येईल. सदर योजनेची मदुत ३१.०३.२०१५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात तोट्यात चाललेल्या दुध संघाला वाचविण्यासाठी ३० रुपये हमीभाव देण्याबाबत**

**(६६) * ३०७७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तोट्यात चाललेल्या दुध संघाला वाचविण्यासाठी ३० रुपये हमीभाव शासनाने द्यावी या व इतर मागण्यांसाठी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथील शेतकऱ्यांनी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रांत अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून प्रांत अधिकारी यांना विविध मागण्याचे निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) या प्रकरणी अद्यापही कोणताच निर्णय झाला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दुधाला ३० रु. हमीभाव मिळावा या मागणीसह विविध मागण्यांचे निवेदन उप विभागीय अधिकारी, अकलूज यांना देण्यात आले आहे हे खरे आहे,

(२) सदर निवेदनात या विभागाशी संबंधित शासनाने दुधाला रु.३०/- प्रतिलिटर हमीभाव द्यावा व इतर राज्यांप्रमाणे दूध उत्पादकास अनुदान द्यावे या मागण्या करण्यात आल्या आहेत.

राज्यातील सहकार क्षेत्रात उपलब्ध होणा-या अतिरिक्त दुधाबाबत बृहन्मुंबई दूध योजना व शासकीय दूध योजनांकडील वितरण वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, उदगीर येथील शासकीय दूध भुकटी प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून इंदापूर येथील खाजगी दूध भुकटी प्रकल्प भाड्याने घेऊन अतिरिक्त दुधाचे दूध भुकटी व लोण्यामध्ये रुपांतरण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृह बांधण्याबाबत**

**(६७) * ३९२३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) आतापर्यंत जागेच्या उपलब्धतेनुसार १८ ठिकाणी वसतीगृह बांधण्यास प्रशासकीय मान्यता दिली असून त्याकरिता रु.४६.२२ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी घनसांवगी (जालना), कोल्हापूर, पनवेल व चंद्रपूर येथील वसतीगृह बांधून पूर्ण झाली असून कोल्हापूर व पनवेल येथील वसतीगृह सुरु झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यात अतिवृष्टी व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(६८) * ३३१६ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील पोहरादेवी, उमरी खुर्द, गोडेंगाव, गोमजी शिवारात माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान झालेली अतिवृष्टी, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना हेतुपुरस्सर वंचित ठेवण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना आर्थिक अनुदानातून वंचित ठेवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तसेच अतिवृष्टी व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापी कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महानिर्मितीचे प्रकल्प उभारणीसाठी सरासरीपेक्षा जास्त खर्च होत असलेल्या अनियंत्रित कारभाराबाबत**

**(६९) * ४७९० श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानिर्मितीचे प्रकल्प उभारण्याबाबत सरासरीपेक्षा जास्त खर्च केला जात असल्याची गंभीर बाब दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीच्या या महाखर्चामुळे भुसावळ येथील दोन वीज प्रकल्पांच्या वीजेसाठी प्रती युनिट ५ रुपये ५२ पैसे म्हणजे तब्बल दुप्पट इतका भरमसाठ दर प्रस्तावित झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानिर्मितीच्या अनियंत्रित कारभाराबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) नाही. महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे संच क्र. ४ व ५ मधून तयार होणा-या वीजेसाठी सन २०१५-१६ करिता रुपये ४.६७ प्रती युनीट एवढा दर प्रस्तावित केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.